# प्रात्यक्षिक भूगोलाच्या विषयाची छोटीशी क्षेत्र भेट(भाग४)

- आमच्या शाळेच्या भूगोलाच्या शिक्षकांनी अफलातून सहल काढली.ती सहल तर होतीच पण तिथे राहून तेथील सर्व गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव त्यात समाविष्ट असल्यामुळे आम्ही सर्व मुले खूप खुश होतो. त्यासाठी त्यांनी आमच्याकडून विविध प्रकारची तयारी करून घेतली.तर मग तुम्हीपण त्या अफलातून सहलीच्या प्रत्यक्ष अनुभवात सामील होताय ना? मग चला तर..............

# सहलीची तयारी

- प्रत्यक्ष सहलीला जायचे म्हणजे तयारी आलीच.
- तयारी ठिकाण ठरविण्याची
- तयारी त्या मार्गाचा नकाशा/आराखडा तयार करण्याची
- तयारी बरोबर नेण्याच्या वस्तूंची यादी करण्याची
- आणि खूप काही ...........
- चला आता तयारीला लागुया तर .......

**क्षेत्र अभ्यास करायचा असेल तर ठिकाणाची निवड आवश्यक त्यासाठी यापैकी किंवा तुम्हाला आवडेल ते ठिकाण निवडा.**



नदी किनारा



कारखाना

# किल्ला किंवा जंगले





# आता तुमच्या मनात प्रश्न आला असेल ना;क्षेत्र अभ्यास म्हणजे काय आणि तो का करायचा ?

- भूगोल अभ्यास निरीक्षणाद्वारे शिकण्याचे शास्त्र आहे.
- आपल्या परिसरातील प्राकृतिक व आर्थिक घटकांची माहिती मिळविण्यासाठी क्षेत्र अभ्यास आवश्यक आहे.
- हि माहिती मिळवण्यासाठी क्षेत्र अभ्यास ही एक चांगली संधी.
- त्याने मानव पर्यावरण यांमधील सहसंबंध जाणून घेता येतो.
- त्यासाठी नियोजन आवश्यक.
- ठिकाण निवडणे आवश्यक.
- पूर्वतयारीही गरजेची.

# खेडेगावातील लोकजीवन






# क्षेत्र अभ्यासाचे महत्व

- प्राकृतिक व सांस्कृतिक घटकांमधील सहसंबंधाचे आकलन
- मानवी परिस्थितीशी जुळवून घेण्याविषयी शिकतो.
- विविध प्रदेशांमधील मानवी क्रियांशी तुलना
- निरीक्षण कौशल्यांचा विकास
- घटनांची कारणमीमांसा जाणून घेणे
- लोकांशी बोलणे वागणे याविषयी शिकतो.
- भेट दिलेल्या प्रदेशाविषयी आपुलकीची भावना जोपासली जाते.

# हवामानाचे घटक





| शहर | तापमान |
|---|---|
| नागपूर | ४५.४ |
| चंद्रपूर | ४५.४ |
| अकोला | ४५.० |
| जळगाव | ४४.९ |
| वर्धा | ४४.५ |
| अहमदनगर | ४३.७ |
| परभणी | ४३.६ |
| यवतमाळ | ४२.६ |
| सांगली | ४२.३ |
| सातारा | ४२.२ |
| सोलापूर | ४२.२ |
| गोंदिया | ४२.१ |
| वाशिम | ४२.० |
| औरंगाबाद | ४१.९ |
| पुणे | ४१.३ |

Please add water cycle animation

# पर्यावरण



पाण्यातील जीवचक्र




उष्णतेचे अंदाजपत्रक

Please add water ecosystem  animation & heat budget

# क्षेत्राची निवड

- राहण्याच्या ठिकाणानुसार क्षेत्र भेटीचे ठिकाणाची निवड करणे शक्य

**क्षेत्र निवड**

| | |
|---|---|
| ग्रामीण शाळा | शहरी शाळा |
| कारखाना | गाव |
| कालवा | खाणकाम |
| धरण | जंगल |
| किल्ला | |


- निवडलेली ठिकाणे विद्यार्थ्यांना जाण्या-येण्यास सोयीस्कर असावीत.

# क्षेत्र भेटीची पूर्व तयारी

- क्षेत्र भेटीचा उद्देश माहित असणे आवश्यक
- निश्चित केलेल्या ठिकाणी पोहोचण्याचा मार्गाचा नकाशा आवश्यक
- संबंधित अधिकाऱ्याची पुर्व परवानगी घेणे.(उदा.कारखाना,धरणे,संरक्षित वने)
- माहितीच्या नोंदी घेण्यासाठी नोंदवही, नमुना प्रश्नावली,पेन,पेन्सिल,मोजपट्टी,टेप,होकायंत्र, विविध वस्तू आणि पदार्थ गोळा करण्यासाठी पिशवी,कॅमेरा,दुर्बीण.
- भेटीच्या प्रदेशातील लोकांची माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली तयार करणे
- मातीचे नमुने दगडांचे नमुने गोळा करण्यासाठी पिशव्या

# प्रत्यक्ष क्षेत्राच्या ठिकाणी करायचा गोष्टी

- आपल्या जाण्याच्या वेळेपासून आपल्या नोंदी ठेवाव्यात.
- माहिती आणि निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेतानाच आपल्या अनुभवांना नोंदवहीत टिपून ठेवणे आवश्यक
- प्रत्येक टप्प्यातील नोंदी आपल्याला अहवाल लेखनात उपयोगी पडतील.
- माहिती घेताना तिचे सर्व मुद्द्यांना धरून आहे याची खात्री करून घ्यावी.उदा.कारखान्याची माहिती घेताना कारखान्यातील कच्चामाल,लागणारा मजूर वर्ग,उत्पादनाचे वितरण,बाजारपेठेची उपलब्धता,प्रत्यक्ष कारखान्यातील कामकाज,यंत्रांचा वापर,मजुरांची सुरक्षा इत्यादी घटकांची माहिती घ्यावी.


निरीक्षणाबरोबर गोळा केलेली सर्व माहिती
चित्रे
अहवाल लेखन
आलेख
आराखडे
छायाचित्रे

| | |
|---|---|
| प्रस्तावना | • ठिकाणाचे नाव,नकाशा,शाळेपासून अंतर,प्रवासाला लागणारी वाहतुकीची साधने |
| स्थान | • क्षेत्र भेटीचे स्थान ठळकपणे दाखवावे,गावाचा संदर्भ त्याच्या प्रशासकीय संदर्भासह द्यावा. |
| प्राकृतिक विशेषता | • भूरचना(सखल,पठारी,टेकडी) याची कल्पना,नद्या,कळावे,विहिरी,सरोवरे यांची नोंद |
| हवामान | • हवामानाचे घटक तापमान,पर्जन्यमान याच्या नोंदी प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मदतीने,किंवा स्थानिक लोकांच्या मदतीने घेणे |
| भूमी उपयोजन | • जमिनीचा वापर कोणकोणत्या कारणासाठी केला आहे याची नोंद (शेती,खाणकाम,वने,कारखाने इत्यादी.) |
| लोकसंख्या | • लोकसंख्या ,पुरुष-स्त्रिया प्रमाण,वय,साक्षरता,निरक्षरता,व्यवसाय सुविधा, राहणीमान |
| निष्कर्ष | • माहिती व निरीक्षणाच्या आधारे नैसर्गिक व सांस्कृतिक पर्यावरणाचा संबंध,व्यवसाय व संसाधनांचा संबंध,हवामान आणि कृषी आकृतिबंध बनविता येईल. |

# उपक्रम

- टिपा लिहा.

१.क्षेत्र भेटीची पूर्वतयारी

२.क्षेत्र भेटीत कुटुंबाची माहिती घेण्यासाठी प्रश्नावली.

# आकारिक मूल्यमापन

- गाळलेल्या जागा भरा.

1. क्षेत्र भेटीला जाण्यापूर्वी मुलांना त्या ठिकाणी जाण्याचा------माहित असणे आवश्यक आहे.
   (प्रदेश,विदेश,<u>उद्देश</u>)
2. क्षेत्र भेटीमुळे विद्यार्थ्यांना ------शी कसे मिळते जुळते घ्यावे हे शिकण्यास मिळते.
   (परिस्थितीशी,लोकांशी, <u>मानव परिस्थितीशी</u>)
3. भूगोल हे -----द्वारे शिकण्याचे शास्त्र आहे.
   (शिक्षणाद्वारे,पुस्तकाद्वारे, <u>निरीक्षणाद्वारे</u>)

# Thank you!

- मग कसा वाटला तुम्हाला क्षेत्र भेटीचा हा अनुभव? आवडला ना! मग तुम्हीही तुमच्या शाळेची अशी अफलातून सहल काढा आणि मस्त मजा करा.
- तुमच्या शाळेच्या क्षेत्र भेटीसाठी तुम्ही कोणते ठिकाण निवडाल?तर मग लागा तयारीला.........
- क्षेत्र भेटीमध्ये आणखी कोणकोणत्या गोष्टी तुम्हाला भेट द्यायला आवडेल त्याविषयी खालील मुद्द्यांच्या आधारे लिहा.अ) ठिकाण का निवडले?आ)काय पाहायला आवडेल?इ)अहवाल लेखन करताना अजून कोणते मुद्दे तुम्ही सुचवाल?
- तुम्ही गेलेल्या सहलीचा अहवाल क्षेत्र भेटीच्या अहवाल लेखनातील मुद्द्यांना धरून लिहा.
- तुम्हाला प्रात्यक्षिकाचा कोणता भाग आवडला याविषयीच्या तुमच्या प्रतिक्रिया मला जरूर कळवा.
- माझा *email id manishad@mkf.org.in*